IHSDP व BSUP योजनेंतर्गत बांधण्यात
आलेली परंतु वितरीत न केलेली घरकुले
प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून
उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१८/प्र.क्र.९८/गृनिधो-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- २५ सप्टेंबर,२०१८.

**वाचा -**

**१) शासन निर्णय क्रमांकः जनेयो-२००६/प्र.क्र.४६/गृनिधो-२, दि.२५ जून,२००७.**
**२) शासन निर्णय क्रमांकः जनेयो-२००७/प्र.क्र.५२/गृनिधो-२, दि.२५ जून,२००७.**
**३) शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो- (सेल),दि.९ डिसेंबर,२०१५.**

**प्रस्तावना -**

सन २००५ मध्ये केंद्र सरकारकडून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (JNNURM) अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) आणि शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात आलेल्या आहेत. या दोन्ही योजनांतर्गत राज्यामध्ये १,७५,०३२ इतकी घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी १,३९,६३५ इतकी घरकुले पूर्ण झालेली असून २२,७६४ घरकुलांचे बांधकाम सुरु आहे. तर बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांपैकी आजमितीस २९,९५२ इतकी घरकुले लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आलेली नाहीत. सदर घरकुलांचा लाभार्थ्यांना ताबा देण्याची कार्यवाही संबंधित अंमलबजावणी यंत्रणामार्फत अद्यापही सुरु आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना घरकुलांचा ताबा न देण्यात आलेल्या घरकुलांची संख्या भविष्यात कमी होण्याची शक्यता आहे. असे असले तरीही बांधकाम पूर्ण होऊनही घरकुलांचा वापर न झाल्यामुळे सदर घरकुले विनावापर पडून राहिल्यास अयोग्य होण्याची शक्यता आहे. तसेच घरकुले विनावापर पडून राहिल्यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होत आहे. सदर दोन्ही योजनांचा कालावधी दि.३१.३.२०१७ रोजी संपुष्टात आलेला आहे. परिणामी यापुढे केंद्र तसेच राज्य सरकारकडून सदर योजनांसाठी निधी उपलब्ध होणार नाही. यास्तव, सदरची घरकुले विविध कारणांमुळे बेघर असलेल्या पात्र लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (JNNURM) अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनात बांधण्यात आलेली व विनावापर पडून असलेली घरकुले संबंधित अंमलबजावणी यंत्रणेच्या अखत्यारितील खालील ३ प्रकारे प्रभावित लोकांची पात्रता तपासून प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देता येतील.

अ) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) आणि शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांतर्गत घरकुलांच्या लाभापासून वंचित राहिलेल्या मूळ पात्र लाभार्थी,

ब) जेथे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) अंतर्गतची घरकुले उपलब्ध आहेत. तेथील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अखत्यारितील प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थी आणि

क) राज्यात विविध विकास प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खालील अटींच्या अधीन राहून घरे उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त अ), ब) ,क) यामध्ये सुसूत्रता राहण्यासाठी, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) अंतर्गत उपलब्ध रिक्त घरकुलांची अ),ब) आणि क) यांच्याकडून जशी मागणी करण्यात येईल, त्या मागणी प्रमाणे घरकुले लाभार्थ्यांना वितरीत करण्यात यावीत.

तसेच एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे (BSUP) मधील अवितरीत घरकुलांच्या वाटपाबाबत खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेकरिता निर्गमित केलेल्या मार्च,२०१६ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अटी व शर्ती (जसे की, देशातील कोणत्याही भागात पक्के घरे नसणे, उत्पन्न मर्यादा या व आदी बाबी) विचारात घेऊन अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबांची पात्रता संबंधित विकास प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेकडून निश्चित करण्यात यावी,

२) सदर प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन संबंधित विकास प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेकडून करण्यात येणार असल्याने अशा पात्र कुटुंबांना देण्यात येणाऱ्या घरकुलांची किंमत/रक्कम या यंत्रणेने प्रचलित बाजारमुल्य दर तक्त्यातील दरानुसार सुकाणू अभिकरण/म्हाडाकडे जमा करण्यात यावे,

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांमधील घरकुले प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वितरीत करताना अनुज्ञेय असलेले केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे सर्व लाभ देय राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९२५१५३५५५६४०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Dhanawade

Digitally signed by Ramchandra Dhanawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf4fd1e4249e6612552db1552e149b0688899cac7ecc37ca9fbf60ec7d9103d6, cn=Ramchandra Dhanawade
Date: 2018.09.25 15:41:21 +05'30'

**(रा.कों.धनावडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, (पत्राने)
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म.वि.स,विधानभवन, मुंबई-३२.
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, म.वि.स.,विधानभवन, मुंबई-३२.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
९. व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

१२.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

१३.व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), नवी मुंबई.

१४.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, के.सी.मार्ग, बसडेपो समोर, बांद्रा रिक्लेमेशन, बांद्रा(पश्चिम), मुंबई-५०.

१५.सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

१६.महानगर आयुक्त, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नाशिक/नागपूर, महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणे.

१७.सर्व आयुक्त, महानगरपालिका आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपालिका/नगरपंचायत (प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत समावेश असलेल्या ३८२ शहरांनुसार).

१८.निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.